सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
दुसरा मजला, ५-बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र. 020-26122846/47 विस्तारीत क्र.217 ते 219 ई-मेल -agricredit16@gmail.com

जा.क्र. कृषीपत-08/व्याज परतावा-1/जिमस बँका/2022 दिनांक - 15/07/2022

# :- परिपत्रक -:

**विषय :- पीक कर्जावरील व्याज परतावा (2.5%)प्रस्ताव दाखल करण्याबाबत.**

संदर्भ:- 1. शासन निर्णय क्र. सीसीआर 0313/प्र.क्र. 144/2-स, दि. 05/09/2014
2. शासन निर्णय क्र. अर्थस 0615/प्र.क्र. 226/2-स, दि. 31/10/2015 व दि. 16/02/2016
3. या कार्यालयाकडील परिपत्रक कृषिपत-4/व्याज परतावा/सुधारित दि. 23/02/2016 व सम क्र. दि.08/04/2022

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामार्फत वितरित केल्या जाणा-या रुपये तीन लाखापर्यंतच्या अल्प मुदती पीक कर्जावर राज्य शासनामार्फत संदर्भिय शासन निर्णय दि. 05/09/2014 अन्वये 2.5% दराने व्याज परतावा देण्यात येत आहे. शासन निर्णय दि. 31/10/2015 मधील तरतुदीनुसार बँकांनी वार्षिक व अतिरिक्त व्याज परतावा मागणी प्रस्ताव वैधानिक लेखापरिक्षकाकडून तपासून- प्रमाणित करुन सादर करावयाचे आहेत. व्याज परतावा मागणी प्रस्ताव सादर करण्याबाबत या कार्यालयाकडील संदर्भिय परिपत्रक दि. 23/02/2016 व दि. 08/04/2022 अन्वये मार्गदर्शनपर सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील 2.5% दराचे व्याज परतावा मागणी प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्याबाबत खालीलप्रमाणे सुधारित परिपत्रकीय सूचना देण्यात येत आहेत. या सूचनेप्रमाणे कटाक्षाने कार्यवाही करावी.

1. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी संदर्भिय शासन निर्णय दि. 05/09/2014, 31/10/2015 व दि. 16/02/2016 मध्ये नमुद सूचनाप्रमाणे त्याचप्रमाणे या कार्यालयाकडील संदर्भिय परिपत्रक दि. 23/02/2016 मधील तरतुदीनुसार व्याज परतावा मागणीचे वार्षिक/अतिरिक्त प्रस्ताव तयार करुन वैधानिक लेखापरिक्षकामार्फत तपासून-प्रमाणित करुन घ्यावेत.
2. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी उक्त प्रमाणे तयार केलेले प्रस्ताव थेट या कार्यालयाकडे न पाठविता विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाकडे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने सादर करावेत.
3. विभागीय सहनिबंधक यांनी सदरचे प्रस्ताव जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-1 यांचेकडून तपासून घ्यावेत.
4. जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांनी सदरचे प्रस्ताव कमाल एक महिन्याच्या कालावधीत तपासून विभागीय सहनिबंधक कार्यालयाकडे सादर करावेत.
5. विभागीय सहनिबंधक यांनी जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांचे तपासणीनुसार बँकेने मागणी केलेल्या रक्कमेमध्ये तफावत (रक्कम कमी/जादा)आढळल्यास त्याबाबत बँकेकडून खुलासा घ्यावा. तसेच बँकेच्या खुलाश्यानुसार बँकेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त करुन घ्यावा.
6. विभागीय सहनिबंधक यांनी उक्त प्रमाणे कार्यवाही झालेले प्रस्ताव त्यांचे छाननी अहवालासह व अभिप्रायासह या कार्यालयाकडे मंजूरीस्तव सादर करावेत.
7. विभागीय सहनिबंधक यांनी 2.50% व्याज परतावा प्रस्ताव त्यांचेकडे प्रथम प्राप्त झालेपासून एकुण दोन महिन्याचे आत या कार्यालयाकडे मंजूरीस्तव सादर करावेत.

8/5/22, 20/2/16

8. विभागीय सहनिबंधक यांनी त्यांचे कार्यकक्षेतील बँकांसाठी 2.50% व्याज परताव्यासाठी शासनाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अंदाजपत्रकीय तरतूदीचे /पुरवणी मागणीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करावेत.
9. विभागीय सहनिबंधक यांनी व्याज परताव्याबाबतची नोंदवही त्यांचे कार्यालयामध्ये ठेऊन त्यामध्ये बँकनिहाय नोंदी घ्याव्यात व नोंदवही अद्ययावत राहील याची दक्षता घ्यावी.

याप्रमाणे राज्य शासन 2.50% व्याज परतावा मागणीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे दाखल करण्याबाबत सुधारित कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे. सदर कार्यपध्दतीप्रमाणे कार्यवाही राहील याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**(अनिल कवडे)**
**सहकार आयुक्त निबंधक**
**सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे**

**प्रत माहितीस्तव:-**
1. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व- मुंबई वगळून)
2. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था (सर्व-मुंबई/वर्धा वगळून)
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (सर्व-मुंबई/वर्धा वगळून)
4. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) (सर्व)